न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

**विदयानगरी, हंस भुग्रा मार्ग,कलीना,सांताक्रुझ (पुर्व) मुंबई - ४०० ०९८**

दूरध्वनी क्रमांक - ०२२-२६६७०७५५/०९६५/४१५७ फॅक्स - ०२२-२६६७०८४४

**ई-मेल** - dir.fsl@maharashtra.gov.in **वेबलिंक** - dfsl.maharashtra.gov.in

महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दि.०८.०१.२०१६ नुसार शासन निर्णय क्रमांक,गृह विभाग,एमआयएस-१३१६/प्र.क्र १३७ /पोल-४, दिनांक ०४.०५.२०१६ अन्वये न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय यांच्या आस्थापनेवर निव्वळ तात्पुरत्या तत्वावर कंत्राटी पध्दतीने १ वर्षासाठी सहायक रासायनिक विश्लेषक (गट- ब), वैज्ञानिक सहायक,(गट क), प्रयोगशाळा परिचर(गट-ड) व लिपिक टंकलेखक (गट-क) या पदांसाठी शासकीय कार्यालय/शासनाचे उपक्रम/स्थानिक स्वराज्य संस्था मधील सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचा-यांमधून करार पध्दतीने निवड यादी तयार करण्यासाठी विहीत केलेल्या आवेदन पत्रानुसार अर्ज मागविण्यात येत आहे. सदर अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दि.१२.०८.२०१६ अशी राहिल. प्राप्त अर्जामधुन पात्र उमेदवारांची निवड करुन सूची (Panel) तयार करण्यात येईल व त्यानुसार नेमणुका करण्यात येतील.

आवेदन पत्र खालील पत्यावर फक्त स्पीडपोस्ट किंवा रजिस्टर पोस्टाव्दारे स्विकारले जातील तसेच विहित कालावधीत न आलेले अर्ज व पूर्ण न भरलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतले जाणार नाहीत.

पत्ता : न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, गृह विभाग, महाराष्ट्र शासन, हंस भुग्रा मार्ग, विद्यानगरी, कलीना (मुंबई विद्यापीठाजवळ), सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०० ०९८.

| पदनाम | शैक्षणिक अर्हता | पदे | | दर्जा | *आरक्षण | मासिक परिश्रमिक |
|---|---|---|---|---|---|---|
| सहायक रासायनिक विश्लेषक | मान्यता प्राप्त विदयापिठाची रसायनशास्त्र किंवा जीवरसायनशास्त्र शाखेतील व्दितीय श्रेणीतील पदव्युत्तर पदवी किंवा समतुल्य अर्हता व संबधित कामाचा ३ वर्षे अनुभव असणे आवश्यक आहे. | मुंबई | ८ | गट - ब | अनु-जाती -५<br>अनु जमाती - ३<br>विजा (अ) - १<br>भज (ब) - १<br>भज (क) - १<br>भज (ड) - १<br>विमाप्र - १<br>इमाव - ७<br>खुला - १९ | सेवानिवृत्तीपुर्वी मिळत असलेल्या एकुण वेतनातुन (मुळ वेतन व महागाई भत्ता धरुन ) त्यांना आता मिळत असलेले एकुण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक परिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल. अशा परिश्रमिक रक्कमांची कमाल मर्यादा मासिक रु. ४०,०००/- (रुपये चाळीस हजार )इतक्या मर्यादेत असेल. |
| | | नागपूर | ८ | | | |
| | | पुणे | ११ | | | |
| | | औरंगाबाद | ८ | | | |
| | | नाशिक | ३ | | | |
| | | अमरावती | १ | | | |
| | | एकूण | ३९ | | | |
| वैज्ञानिक सहायक | मान्यता प्राप्त विदयापिठाची रसायनशास्त्र शाखेतील व्दितीय श्रेणीतील विज्ञान शाखेची पदवी व संबधित कामाचा ३ वर्षे अनुभव असणे आवश्यक आहे. | मुंबई | ८ | गट - क | अनु-जाती -५<br>अनु जमाती - ३<br>विजा (अ) - १<br>भज (ब) - १<br>भज (क) - १<br>भज (ड) - १<br>विमाप्र - १<br>इमाव - ७<br>खुला - १९ | |
| | | नागपूर | ८ | | | |
| | | पुणे | ११ | | | |
| | | औरंगाबाद | ८ | | | |
| | | नाशिक | ३ | | | |
| | | अमरावती | १ | | | |
| | | एकूण | ३९ | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| प्रयोगशाळा परिचर | माध्यमिक शालांत परिक्षा अनुर्तीण (दहावी नापास) व संबधित कामाचा ३ वर्षे अनुभव असणे आवश्यक आहे. | मुंबई | ८ | गट - ड | अनु-जाती -५<br>अनु जमाती - ३<br>विजा (अ) - १<br>भज (ब) - १<br>भज (क) - १<br>भज (ड) - १<br>विमाप्र - १<br>इमाव - ७<br>खुला - १९ | |
| | | नागपूर | ८ | | | |
| | | पुणे | ११ | | | |
| | | औरंगाबाद | ८ | | | |
| | | नाशिक | ३ | | | |
| | | अमरावती | १ | | | |
| | | एकूण | ३९ | | | |
| लिपिक टंकलेखक | माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण (दहावी पास) आणि मराठी ३० श.प्र.मि व इंग्रजी ४० श.प्र.मि. टंकलेखन, प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण व संबधित कामाचा र ३ वर्षे अनुभव असणे आवश्यक आहे. | मुंबई | २ | गट - क | अनु-जाती -१<br>अनु जमाती - १<br>विजा (अ) - १<br>इमाव - २<br>खुला - ५ | |
| | | नागपूर | २ | | | |
| | | पुणे | ३ | | | |
| | | औरंगाबाद | २ | | | |
| | | नाशिक | १ | | | |
| | | एकूण | १० | | | |

*** उपरोक्त नमूद आरक्षण शासन मान्यतेच्या अधीन राहून देण्यात आलेले असून त्यामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.**

**विहित नमुन्यातील संपूर्ण भरलेला अर्ज आवश्यक त्या संबंधीत प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रतींसह सादर करणे आवश्यक आहे.**

<u>अटी व शर्ती :-</u>

१) अर्ज विहित नमुन्यात स्वहस्ताक्षरात सर्व दृष्टिने पूर्ण असावेत. विहित नमुन्यामध्ये नसलेले व अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

२) अलीकडच्या काळात काढलेले पारपत्र आकारातील उमेदवाराचे छायाचित्र त्यांच्या स्वाक्षरीसह अर्जावर नमूद केलेल्या ठिकाणी चिकटवावे. त्या छायाचित्राच्या दोन अतिरिक्त प्रती पुढील निवड प्रक्रियेसाठी उमेदवाराजवळ ठेवणे आवश्यक आहे.

३) नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकारी/कर्मचारी यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

४) पत्रव्यवहाराचा पत्ता सुस्पष्ट व पूर्ण असावा.

५) उमेदवाराचे वय ७० वर्षापेक्षा अधिक नसावे.

६) सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी शारीरिक, मानसिक वा आरोग्यच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

७) महाराष्ट्र राज्याच्या रहिवाशांनाच मागासवर्गीय प्रवर्गाचे फायदे अनुज्ञेय राहतील.

८) सर्व मागासवर्गीय उमेदवारांनी जाती प्रमाणपत्र व वैधता तसेच नॉन क्रिमिलियर प्रमाणपत्र मुलाखतीच्या वेळेस सादर करावे.

९) नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल.

१०) निवड झालेल्या उमेदवारांच्या मुंबई, नागपूर, पुणे ,औरंगाबाद, नाशिक व अमरावती प्रयोगशाळेत निव्वळ तात्पुरत्या तत्वावर १ वर्षे मुदतीसाठी कंत्राटी पदधतीने नेमणुका करण्यात येतील व या कालावधीत सेवानिवृत्तीपुर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मुळ वेतन व महागाई भत्ता धरुन ) त्यांना आता मिळत असलेले एकुण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक परिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल. अशा परिश्रमिक रक्कमांची कमाल मर्यादा मासिक रु. ४०,०००/-(रुपये चाळीस हजार )इतक्या मर्यादेत असेल. मुलाखतीस तसेच निवड झालेल्या ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी प्रवासभत्ता अनुज्ञेय नाही.

११) मुलाखतीच्या वेळी उमेदवारांनी अलिकडील फोटो व मान्यता प्राप्त फोटो ओळखपत्र तसेच शैक्षणिक पात्रता, राखीव प्रवर्गासाठी आवश्यक असलेले सर्व प्रमाणपत्र व अनुभवा संदर्भात आवश्यक ती सर्व मूळ प्रमाणपत्रे तसेच त्यांच्या सांक्षाकित प्रती सोबत आणाव्यात अन्यथा मुलाखतीस प्रवेश दिला जाणार नाही.

१२) सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचा-याविरूध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी.

१३) नियुक्तीनंतर उमेदवारांना निवासस्थान उपलब्ध करून देण्याची जबाबदारी या संचालनालयाची असणार नाही.

१४) अधिकारी / कर्मचारी त्यांच्यावर सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावा.

१५) अधिकारी / कर्मचारी यांनी Conflict of Interest जाहिर करणे आवश्यक राहील.

१६) करार पद्धतीवरील अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे/ माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

१७) अधिकारी/ कर्मचारी यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील.त्यांच्या कामाकाजा बाबत नियुक्त प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.

१८) करार पद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/ सामावून घेण्याबाबतचे व नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/ हक्क राहणार नाही.

**<u>महत्वाच्या विशेष सूचना :-</u>**

१. सदर कंत्राटी पध्दतीचा कालावधी नियुक्तीपासून फक्त १ वर्षाचा राहील व कालावधीनंतर त्यांची आपोआप सेवा संपुष्टात येईल.
२. निवड झालेल्या उमेदवारांना संबंधित पदावर नियुक्ती करण्यापूर्वी १०० रूपयांच्या बॉड पेपरवर प्रतिज्ञापत्र /बंधपत्रावर द्यावे लागेल.
३. प्रयोगशाळेच्या कोण्त्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.
४. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस किंवा कोणत्याही टप्प्यावर स्थगित /रदद ठेवण्याचे अधिकार मा.संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, म.रा.,मुंबई यांना राहतील.
५.

स्वाक्षरी/-
(बा.ब.दौंडकर)
प्रभारी संचालक,न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा,म.शा.,
आणि शासकीय रासायनिक विश्लेषक

दिनांक - २०.०७.२०१६
स्थळ - मुंबई

न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, गृह विभाग, महाराष्ट्र शासन
**विदयानगरी, हंस भुग्रा मार्ग,कलीना,सांताक्रुझ (पुर्व) मुंबई - ४०० ०९८**
दूरध्वनी क्रमांक - ०२२-२६६७०७५५/०९६५/४१५७ फॅक्स - ०२२-२६६७०८४४
**ई-मेल** - dir.fsl@maharashtra.gov.in **वेबलिंक** - dfsl.maharashtra.gov.in

स्वसाक्षांकित केलेला
नजिकच्या काळात
काढलेला पासपोर्ट साईझ
उमेदवाराचा फोटो

## अर्जाचा नमुना

प्रति,
मा.संचालक,
न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय,महाराष्ट्र राज्य,
कलीना, सांताक्रुझ (पुर्व) मुंबई - ४०० ०९८

ज्या पदासाठी अर्ज केला आहे ते पदनाम -: ------------------------------------------
महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने मी विनंती पुर्वक अर्ज सादर करतो/करते की, मी शासन निर्णय दि. ०८.०१.२०१६ मधील अटी व शर्ती पुर्ण करीत असुन वरील विषयात नमुद केलेल्या कामाच्या अनुषंगाने काम करण्यास इच्छुक असुन माझी खाली नमुद केल्यानुसार माहिती सादर करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | सेवानिवृत्त अधिकारी /कर्मचारी यांचे पुर्ण नाव | |
| २ | पत्रव्यवहाराचा पुर्ण पत्ता /संपर्क दुरध्वनी/ भ्रमणध्वनी क्रमांक / Email ID | |
| ३ | सेवानिवृत्तीवेळी धारण केलेले पद व विभाग | |
| ४ | शासकीय सेवेत आल्याचा दिनांक/शासकीय सेवेत आल्यापासुन सेवानिवृत्ती पर्यत धारण केलेली पदे व कार्यालय | |
| ५ | सेवानिवृत्तीचा दिनांक | |
| ६ | अर्जाच्या दिनांकास पुर्ण वय | |
| ७ | सेवानिवृत्ती पुर्वी मिळत असलेले वेतन (सबधित कार्यालयाचे प्रमाणपत्र) | |
| ८ | अर्जदार सेवानिवृत्त अधिकारी /कर्मचारी यांचे विरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित अथवा प्रलंबित नसल्याबाबतचे संबधित विभागाचे प्रमाणपत्र | |
| ९ | विवक्षित कामाच्या अनुषंगाने प्रवास करावा लागल्यास तसे हमी पत्र सोबत जोडणे आवश्यक | |
| १० | सदयस्थितीत मिळत असलेले सेवानिवृत्ती वेतन (संबधित कोषागार कार्यालयाचे प्रमाणपत्रासह) | |

स्थळ -

स्वाक्षरी

दिनांक